# मृगजळ

('वेल नाऊ माय प्रिटी' या कादंबरीचा अनुवाद)

लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 277

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**मृगजळ : मधुकर हुद्दार**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ १४०/-

# मृगजळ

# १

पॅरेडाईज शहर म्हणजे मूर्तिमंत स्वर्ग. सर्वांगाने सुंदर व समृद्ध. भौतिक सुखांच्या उपभोगांचं आगर. यामुळे देशोदेशीचे लोक मौज-मस्ती करण्यासाठी येथे येत. पर्यटकांचं तर हे आकर्षणाचं केंद्रच होतं. विविध रंगांची उधळ करणारी फुलं नि शरीराला गुबगुबीत-लुसलुशीत स्पर्शसुख देणारे हिरवेकंच लॉन्स असलेले पार्क येथे भरपूर होते.

पार्कातील एखाद्या बाकावर बसून चोहोबाजूला पाहिलं तर एकच दृश्य दिसे. झाडाला टेकून किंवा हिरवळीवर बसून सुखेनैव रोमान्स करणारी प्रेमी युगुलं, मुलाबाळांसह आलेली कुटुंबवत्सल मंडळी, तसेच किशोरवयीन मुलं-मुली येथे मनमुराद हुंदडताहेत, जीवनाचा आनंद उपभोगताहेत.

फेब्रुवारी महिन्यात तर पर्यटकांची येथे तोबा गर्दी असे. कुणी कॅसिनोत सट्टा खेळून नशीब उजळवायला, महागड्या वस्तूंची खरेदी करून आपल्या संपत्तीचा भार हलका करायला, तर कुणी गुलछबू वृत्तीनं सुंदर तरुणींच्या सहवासात कालक्रमण करण्यासाठी या शहरात येत असत. नगरवासी व पर्यटकांमुळे येथील व्यावसायिकांना भरपूर अर्थलाभ होत असे.

या वेळी फेब्रुवारी महिन्याचा तिसरा आठवडा सुरू होता. पर्यटकांचा ओघ सुरू झाला होता. यात टेक्सास, न्यूयॉर्क आणि उत्तर अमेरिकेच्या नागरिकांचा भरणा अधिक होता. हौशी प्रवाशांच्या स्वागतासाठी सारं पॅरेडाईज शहर मेकअप

करून सज्ज होतं. अशा या मोहक वातावरणात नियतीनं आपला खेळ सुरू केला होता...

पॅरेडाईज शहराच्या पूर्वेकडील एका उंच टेकडीवर असलेल्या पार्कमधील डॉलफिन पुलाजवळ ती उभी होती. त्यानं तिला सायंकाळी साडेचारच्या सुमारास इथंच भेटायला सांगितलं होतं. वेळेपूर्वीच ती हजर होती. तेथील एकूण वातावरणाकडे पाहिल्यावर तिला वाटलं, ही जागा एखाद्या प्रिय पुरुषाला भेटायला किती छान आहे; परंतु तिथल्या गर्दीमुळे या वेळी तिला ही रम्य जागाही अप्रिय वाटू लागली होती. पार्कातील मर्क्युरी लाईटस्‌मुळे इंद्रधनुच्या रंगांचा खेळ सुरू झाला असला; समोरील कॅफेमध्ये पर्यटकांची गर्दी वाढताना, हलक्या मंद धूसर प्रकाशात कॉफीचे घोट पिताना, हास्याचे ध्वनी कानावर पडत असले, तरी ती गंभीर व आपल्याच विचारात मग्न होती. तो अजून यायचाच होता.

लोक कॅसिनो सुरू होण्याची वाट पाहत, आपला वेळ पार्कातील प्रेक्षणीय वस्तू पाहण्यात घालवीत होते. फेब्रुवारी महिना हा गर्मीचा. पण आज त्या मानाने वातावरण विशेष गरम नव्हतं. तरीही ती थोडी अस्वस्थ झाली होती.

पार्कातील ॲक्वेरियममधील रंगीबेरंगी मासोळ्या पाहण्यासाठी गर्दी उसळली होती. परंतु ती मात्र पाण्याबाहेर पडलेल्या मासोळीसारखी आतल्या आत तळमळत होती. तिचे हिरवेकंच डोळे चिंताकूल-व्याकूळ दिसत होते.

ती थोडी ठेंगणी असली तरी देखणी होती. तिने घातलेल्या सुती फ्रॉकमधून तिचं तारुण्यानं मुसमुसलेलं शरीर सुडौल व आकर्षक असल्याचं दिसत होतं. आपलं शरीर घामानं ओलसर झाल्याचं तिला जाणवलं.

तिची व साठीच्या जवळपास असलेल्या त्या माणसाची पहिली भेट जेव्हा झाली, तेव्हाचा प्रसंग तिला आठवला. त्याने अत्यंत आवेगाने तिला आपल्या बाहुपाशात ओढलं होतं. त्याच्या राकट आलिंगनात ती गुदमरून गेली होती, सुखावली होती. तिला त्याच्याकडून काही अपेक्षा होत्या व त्या पूर्ण करण्याचं आश्वासन त्यानं दिल्यामुळे ती आश्वस्त होती.

परंतु तो अजून न आल्यामुळे ती भयभीत झाली होती. तिला घाम फुटला होता. संतापही आला होता. वाट पाहण्यापलीकडे उपायही नव्हता.

अचानक तिला एका राकट पुरुषी हाताचा स्पर्श होत असलेला जाणवला. मागे वळून न पाहता ती पुढे चालू लागली. हा अभद्र माणूस कोण? हे पाहण्याची तिला गरज वाटली नाही. अशी लगट मुकाट्यानं सहन करण्याची तिला सवय झाली होती.

सामान्यत: श्रीमंत लोक, गुलछबू वृत्तीचे तरुण अथवा मध्यम वयाचे लोक असला आचरटपणा तिच्याबरोबर करीत. तिला त्याचं वाईट वाटत नसे. पण अशा लोकांचा तिला तिटकारा वाटे.

ती गर्दीपासून दूर चालत अशा ठिकाणी जाऊन उभी राहिली, जिथून गर्दीतला एक-एक चेहरा व डॉलफिन पुलाजवळील प्रत्येक माणसाचे निरीक्षण करता येईल. या गर्दीत तो पटकन दिसावा, हीच तिची अपेक्षा होती. त्याच्याबरोबर आपल्याला ओळखणारं इथं कुणीही नसावं, अशी तिची इच्छा होती.

एकाच ठिकाणी उभं राहण्यापेक्षा हिंडत-फिरत राहावं, असा विचार करून ती डॉलफिन पुलाजवळील एका गुहेत शिरली. या ठिकाणी लोकांची गर्दी कमी होती. कोलाहलही त्या मानानं कमीच होता. त्या गुहेत कुबट वास भरून राहिला होता. परंतु लोकांनी स्वत:च्या वस्त्रांवर फवारलेल्या सुगंधित स्प्रेमुळे हा कुबट वास सहन होण्यासारखा होता.

क्षणार्धात तिची भिरभिरणारी नजर एका वयस्क माणसावर स्थिरावली. आपल्या चेहऱ्यावर सभ्य हास्य पसरवीत तो गर्दीतून बाहेर पडत होता. फिकट पिवळसर रंगाचा सूट त्यानं परिधान केला होता. पांढऱ्या रंगाची पनामी हॅट त्याच्या हातात होती. पांढऱ्या शुभ्र शर्टावर लालभडक रंगाचा टाय त्याला शोभून दिसत होती. हाच तो, ज्याची ती आतुरतेनं वाट पाहत होती.

तो फारसा उंच नसला तरी शरीरानं बळकट होता. तांबूस वर्ण, गिजरे डोळे नि गालातल्या गालांत मंद स्मित करीत असण्यासारखे वाटावे, असे पातळ ओठ त्याच्या व्यक्तिमत्त्वात प्रभावी भर घालीत होते. डोक्यावरील केस तसे मूळचे तांबूस; पण टोकाशी पांढुरके असल्यामुळे, तो साठीचा असल्याचे स्पष्ट जाणवत होते. त्याचं नाक पातळसर अन् लांब व टोकदार होतं.

त्याचं एकूण व्यक्तिमत्तव भीती वाटण्यासारखं नसलं, तरी त्याच्या नजरेत जरब होती.

हा माणूस विश्वास टाकण्यासारखा खरंच आहे का?

ती क्षणभर घाबरली. हलकेच काढता पाय घ्यावा, असं तिला वाटून गेलं. पण पाय हलेना. मनातल्या आशा-आकांक्षा व भविष्यील सुखमय जीवनाच्या स्वप्नांनी तिला जागीच खिळवून ठेवलं. तो जसजसा जवळ येत होता, तसतशी ती सारा राग विसरून त्याच्याकडे आकृष्ट होऊ लागली. त्याचा तिच्यावर पूर्ण पगडा बसला होता हेच खरं.

''वेल नाऊ... माय प्रेटी....'' तिच्यासमोर थांबत तो म्हणाला, ''तर आपण पुन्हा भेटत आहोत. हो ना? तुला राग आला का? मी उशिरा आलो म्हणून? ओह नो माय डियर! रिलॅक्स.''

ती काहीच बोलली नाही. तो मंद मधुर आवाजात बोलत होता. त्याच्या आवाजातून एक जाळं विणलं जात होतं अन् ती हळूहळू मासोळी होऊन त्या जाळ्यात अडकू लागली होती.

तिला त्याच्या या लाघवी बोलण्याची सवय झाली होती.

''वेल नाऊ माय प्रेटी ऽऽ'' तो तिच्याकडे रोखून पाहत पुन्हा म्हणाला.

ती एक गोष्ट पक्की जाणून होती की, त्याचं असं अभिवादन, हे लाघवी बोलणं, एखाद्या दारुड्याने दिलेल्या आश्वासनासारखंच होतं. तिला तिच्या नितंबावर काढलेल्या अनाहुत चिमट्यासारखी, अशा मधाळ बोलांची पण सवय झाली होती. शांतपणे सर्व सहन करून आपलं ईप्सित साध्य करण्याकडे तिचं लक्ष असे.

पहिल्या भेटीतच तिला कळलं होतं की, त्याचं नाव फ्रँकलिन लुडविक होतं म्हणून. तो म्हणाला होता,

''माझा जन्म फ्रान्समध्ये झाला. शिक्षण वगैरे तिथंच, पत्रकारितेकडे माझा कल सुरुवातीपासूनच होता. त्यामुळे व्यवसाय म्हणून मी पत्रकारच झालो. इथे मी कॅसिनोवर एक लेख लिहायला म्हणून आलोय. सर्व लहान-मोठे कॅसिनो पाहिले. टिपणं घेतली, फोटोसुद्धा काढले; परंतु अजूनही बरीच माहिती अज्ञातच आहे.'' तिच्या दृष्टीने यात आश्चर्यकारक असं काहीच नव्हतं. यापूर्वी असे अनेक पत्रकार कॅसिनोबद्दल लिहायला पॅराडाईज शहरात येऊन गेल्याचं तिला ठाऊक होतं.

फ्लोरिडामधील अत्यंत महत्त्वपूर्ण व आकर्षक असं हे स्थळ होतं. फेब्रुवारी महिना म्हणजे कॅसिनोचा हाय सीझन होता. कोट्यवधी डॉलर्सचा सट्टा इथे

खेळला जाई. संपत्तीचा प्रवाह जेव्हा इथं धबधब्याचं रूप घेई, तेव्हा पाहणाऱ्यांचे डोळे पांढरे होत असत.

सट्ट्यात कोण जिंकतो, कोण हरतो, याची कुणालाच पर्वा नसायची. फक्त संपत्ती उधळायची हाच शौक, हीच नशा. जगातील कुबेरांची यासाठीच इथं गर्दी होत असे.

अशाच एका दुपारी लुडविक तिच्याकडे आला होता. या वेळी ती समुद्राच्या किनाऱ्यावर सूर्यस्नान करण्यात मग्न होती. लुडविकनं दुरूनच तिला हेरलं अन् रुबाबदार पावलं टाकत तो बीचवर पोहोचला होता. तेच मनमोहक हास्य लुडविकच्या चेहऱ्यावर पसरलं होतं. ती डोळे मिटून वाकून पहुडली होती.

अनुभवानं लुडविकच्या अस्तित्वाची तिला जाणीव होताच, तिनं डोळे उघडले होते. वयानं प्रौढ, वागण्यात सभ्य अन् चेहऱ्यावर सदाबहार हास्य असलेल्या लुडविकला पाहताच तिला, तरुण सुरक्षित वाटलं होतं. ती प्रभावित झाली होती.

यामुळे तिच्या मनात शंकाच आली नाही की, त्याला तिच्या तारुण्याचा उपभोग घ्यायचा होता व बरेच काही त्याच्या मनात होते.

लुडविकनं तिला दिलेल्या आयडेंटिटी कार्डवर तो न्यूयॉर्कर मॅगेझिनशी संबंधित असल्याचं तिला कळलं होतं. त्यानं तिला हेही सांगून टाकलं होतं की, ती कॅसिनोत काम करते, हे त्याला माहीत होतं. तिला आठवलं. तो म्हणाला होता,

''मला कॅसिनोच्या अंतर्गत व्यवस्थेची चोख माहिती हवी आहे. याच माहितीच्या शोधात मी हिंडतोय.''

हे बोलताना तो तिच्या बाजूला वाळूत गुडघे रुतवून बसला होता. त्याची पनामा हॅट या वेळी त्याच्या नाकाच्या टोकापर्यंत वाकलेली होती. आपले गिजरे डोळे तिच्या मोहक चेहऱ्यावर रोखीत तो म्हणाला होता,

''हे बघ, मी कॅसिनोचा मॅनेजर हॅरी लुईसला भेटलो असतो व त्यानं जुजबी माहितीही पुरवली असती. पण मी बेत बदलला. लुईसनं पुरविलेल्या माहितीवर मी अवलंबून राहिलो अन् लेख तयार केला, तर तो न्यूयॉर्क मॅगेझिनच्या संपादकाला पसंत पडणार नाही. कारण हे एक दर्जेदार मॅगेझिन आहे. त्यात असं

तसं लिहून भागायचं नाही.'' हॅरी लुईसबद्दल बोलताना त्याच्या कपाळावरील आठ्यांचं जाळं अधिक ताणलं गेलं होतं. पनामा हॅट थोडी वरखाली झाली होती.

हॅरी लुईसबद्दल तो म्हणाला होता,

''हॅरी एक विचित्र माणूस आहे. संशयी, विक्षिप्त, तो हवी ती माहिती मला देणार नाही, याची खात्री आहे.''

''पण माझा तुम्हाला उपयोग होऊ शकेल, असं वाटायला कारण?'' तिनं विचारलं होतं.

''कारण, तू इतर मुलींबरोबर व्हॉल्टमध्ये काम करतेस. होय ना?''

''हो. पण? हे जमेलसं वाटत नाही.''

''वेल... देन... माय प्रेटी ऽऽ. यात न जमण्यासारखं काय आहे?''

''मला भीती वाटते. कॅसिनोची अंतर्गत माहिती लीक करणं, हा गुन्हा आहे. मी पकडले गेले तर नोकरी जाईल अन्....''

''अन् काय होईल?''

''माझं आयुष्य उधळलं जाईल. भावी जीवनाचं स्वप्न भंगून जाईल.'' या तिच्या वाक्यावर लुडविकनं विकट हास्य केलं होतं. हास्याचा खळखळाट थांबल्यावर तो म्हणाला होता,

''तू कशाचं स्वप्न बघते आहेस? तू तरूण आहेस, सुंदर आहेस. कुणीही तुझ्याशी लग्न करायला तयार होईल.''

''प्रश्न लग्नाचा नाही. कायम नोकरीचा, नियमितपणे मिळणाऱ्या पैशाचा आहे. नोकरी गेल्यावर कसलं लग्न अन् कसलं काय!''

''म्हणजे प्रश्न पैशाचा आहे. ठीक. समजा मी तुला भरपूर मोबदला दिला तर?''

''पण कशासाठी?''

''मला हव्या असलेल्या कॅसिनोतील अंतर्गत माहितीसाठी. विचार कर. पैसा. शिवाय, तुझं नाव लीक होणार नाही, याची गॅरंटी.''

''ही गॅरंटी असेल तर... पण पैसे किती देणार?''

''पाचशे डॉलर्स. माझं न्यूयॉर्कर मॅगेझिन धनसंपन्न आहे. बोल, काय विचार आहे? माणसानं कसं प्रॅक्टिकल असावं! भित्री व इमोशनल माणसं या जगात काहीच मिळवू शकत नाहीत.''